जिल्हा कारागृहातील बंद्यांना स्वयंरोजगाराचे धडे: बंद्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
>> पान 2
'उमेद' विभागीय, जिल्हा मिनी सरस महोत्सवाची सांगता
>> पान 3
वैद्यकीय जैविक कचरा प्रकरणाचा तपास संशयाच्या भोवऱ्यात
>> पान 4


**सुविचार**
जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 206 ■ शनिवार, दि. 08 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


## महाराष्ट्रातील लाखो नागरिक होणार

# वीज बिलमुक्त

### शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार

### मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

**दैनिक आपला विदर्भ**

मुंबई/प्रतिनिधी : बळीराजा मोफत वीज जाहीर केल्यानंतर याचा ४५ लाख शेतकऱ्यांना फायदा होत असल्याचे मत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. सर्वाधिक म्हणजे १६ हजार मेगावॅट वीज कृषीला देणार महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत सर्व शेतकऱ्यांना वीज ही सोलरच्या माध्यमातून दिली जाईल असेही मुख्यमंत्री म्हणाले. शेतकऱ्यांना दिवसा ३६५ दिवस वीज मिळणार आहे. कोणालाही रात्री पिकाला पाणी सोडण्याची गरज पडणार नाही असे मुख्यमंत्री म्हणाले. १ कोटी ३४ लाख ग्राहकांना मोफत घरगुती लाईट देणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.



२०३० पर्यंत ५२ टक्के वीज ही अपारंपारिक उर्जेतुन असणार आहे. डेटा सेंटर ज्यांच्याकडे आहे तो सर्वात श्रीमंत आहे. त्यांना सर्वात महत्वाची वीज आहे. त्यांना वीज देण्याचा प्रयत्न केला जाईल असेही मुख्यमंत्री म्हणाले. दरवर्षी विजेचे दर ९ टक्के वाढत असतात. १ लाख १३ हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. विजेचे भाव कमी होत जाणार आहेत. पाच वर्षात २४ टक्क्यांनी विजेचे दर कमी करत आहेत. ९५ टक्के घरगुती विजेत दिलासा देणार असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. स्मार्ट मिटर लावला तर दिवसा १० टक्के वीज बिलावर रिबीट येणार असल्याचेही ते म्हणाले.



## कोरटकर असो वा सोलापूरकर कोणालाही सोडणार नाही

### शिंदेंचा सभागृहातून इशारा, सदस्यांनी वाजवल्या टाळ्या

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर विधानपरिषदेत भाषण केले. त्यावेळी, राज्यपालांनी महाराष्ट्राचे सुस्पष्ट चित्र मांडल्याचं त्यांनी म्हटलं. विक्रमी बहुमताने आम्ही निवडून आलोय, उद्योग बाहेर गेलेत यावर विरोधकांची कॅसेट अडकली आहे. मात्र, देवेंद्रजींच्या नेतृत्वात आमची दमदार सुरुवात झाली आहे. दुप्पट वेगाने आणि चौपट क्षमतेने आम्ही काम करतोय, आणखी जोमाने काम करायचं आहे. विकासकामे आणि कल्याणकारी योजना आपण राबवल्या आहेत. जनतेने याच कामावर आम्हाला विक्रमी बहुमत दिल्याचं सांगत एकनाथ शिंदे यांनी विविध मुद्द्यावर भाष्य केलं. यावेळी, राज्यात महिलांवरील अत्याचार आणि महापुरुषांबद्दल सुरू असलेल्या वक्तव्यांवरुन होणाऱ्या संतापावरही एकनाथ शिंदेंनी विधानपरिषदेतून थेट इशारा दिला. सोलापूरकर, कोरटकर कुणालाही सोडणार नाही, असा इशारा एकनाथ शिंदे यांनी दिला आहे.



भय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्यावरुन राजकारण करण्यात आलं. कारण, त्यांनी आपल्या वक्तव्यावरुन स्पष्टीकरण दिलं आहे. तर, छत्रपती संभाजी महाराजांचा अवमान करणाऱ्या अबू आझमींविरुद्ध देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा, अशी मागणी मीच केली होती. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज या महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना सोडणार नाही. अबू आझम असो, प्रशांत कोरटकर किंवा राहुल सोलापूरकर यांना देखील सोडणार नाही, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिमंडळातून थेट इशारा दिला आहे. त्यावेळी, इतर सदस्यांनी टाळ्या वाजवून दाद दिली. तसेच, बीडमध्ये जे कौर्य झालं हे आपण पाहिलं, ही विकृती आपण ठेचून काढली पाहिजे, अशा लोकांना जेरबंद केल्याशिवाय आम्ही राहणार नाही. बदलापूर, स्वारगेट घटना घडल्या, लाडक्या बहिणींवर नराधम अन्याय करत आहेत, त्यांना कुणालाही सोडलं जाणार नाही. बदलापूरला जि कारवाई झाली ती सर्वांनी पहिली होती, अशा शब्दात एकनाथ शिंदे यांनी आरोपींना थेट इशाराच दिलाय.

### १५ लाख कोटींची गुंतवणूक

विरोधक हे उद्योगांबद्दल बोलेले, पण हे करार कागदावर राहणारे नाहीत. गेल्या अडीच वर्षात महाराष्ट्रात परतीय गुंतवणूक देखील वाढली आहे. गेल्या दोनवेळा मी दोवासमध्ये साडे सात लाख कोटींचे करार केले आहेत, आणि आता १५ लाख कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रात करण्यात आलीय. सब्र का फल मिठा होता है. दीड ट्रीलियन गुंतवणूक फक्त एमएमआर रिजनमध्ये आहे, असेही एकनाथ शिंदेंनी सांगितले.







# मेहकर तालुक्यात पाणी टंचाईचे चटके

## जलजीवन मिशनचा बट्ट्याबोळ

### गावात पाण्यासाठी कल्लोळ : हिवरा साबळे, जवळा, येथील प्रकार




**दैनिक आपला विदर्भ**

मेहकर : गावातील पाणीटंचाई दूर व्हावी, महिलांना मुबलक व स्वच्छ पाणी दारात मिळावे, यासाठी शासनाने कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करून जल जीवन मिशन अंतर्गत कामे सुरू केली आहे. मात्र, सदर कामाला भ्रष्टाचाराची वाळवी लागली की काय. जल जीवन मिशनचे अपवाद वगळता काम पूर्ण झाले नाही.त्यामुळे गावात पाण्याची भीषण पाणी टंचाई निर्माण झाल्याची नागरिकांमध्ये खमंग चर्चा. जलजीवन मिशनचा बट्ट्याबोळ झाला असताना दुसरीकडे गावात पाण्यासाठी कल्लोळ उठला आहे. जल जीवन मिशनचे काम पूर्ण झाले असते तर, गावातील पाणीटंचाई निवारण महिलांच्या डोक्यावरील हंडा खाली उतरला असता मात्र, अधिकारी व ठेकेदाराच्या दुर्लक्षित धोरणामुळे जल जीवन मिशन योजनेचा सर्वत्र झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

मेहकर तालुक्यातील ९२ गावांमध्ये जल जीवन मिशन योजने अंतर्गत विहरी खोदकाम, पाणीपुरवठा, पाईप लाईन, पाण्याची टाकी, पाण्याची वितरण व्यवस्था आदी कामे करण्यासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यातील बहुतांश गावात सदर काम हे सुरू होऊन वर्ष दोन वर्षाच्यावर कालावधी झाला आहे.मात्र, गावातील जल जीवन मिशन योजनेचे काम पूर्ण न झाल्याने गावातील पाण्याची समस्या ही कायम राहिली आहे. त्यामुळे आता प्रशासनाला चक्क टँकरने पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे.मेहकर तालुक्यातील चार गावात शासनाने पाणीपुरवठा करण्यासाठी टँकर मंजूर केले आहेत. विशेष म्हणजे ज्या गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्या गावांमध्ये जलजीवन मिशनचे कामे रखडलेले दिसून येत आहे.जवळा येथे ७६ लाख १३ हजार रुपयाच्या जलजीवन मिशनच्या कामाला २२ ऑगस्ट २०२२ रोजी कार्यारंभ आदेश मिळाला होता. सदर कामे १८ महिन्यात पूर्ण करणे आवश्यक होते. मात्र, अद्यापही हे काम पूर्णत्वास गेले नाही. विहीर खोदकाम पंपगृह मशिनरी मुख्य जलवाहिनी पाण्याची टाकी वितरण व्यवस्था अधिक कामी करण्यास सुरू असताना आवश्यक असताना केवळ विहीर खोदकाम व पाण्याच्या टाकीचे काम प्रगती पथावर असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे येथेही भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून प्रशासनाला टँकरने पाणी करण्याची वेळ आली आहे. त्याचबरोबर हिवरा साबळे येथे तब्बल दोन कोटी ६२ लाख ३६ हजार रुपयांच्या जलजीवन मिशनच्या कामाला ३१ जानेवारी २०२३ रोजी कार्यारंभ आदेश मिळाला होता. सदर काम १२ महिन्यात पूर्ण करणे आवश्यक असताना अद्यापही पूर्ण झाली नाही, या योजनेअंतर्गत विहिरीचे खोदकाम करण्यात आले. मात्र, विहीर कोरडी गेल्याने याचा कोणताही फायदा झाला नाही. तर, पाईप लाईन करण्यासाठी पाईपची खरेदी करण्यात आली आहे. मात्र, पुढील काम अद्याप झाले नसल्याने या गावातही भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे.पारंडी, वरवंड या गावातही भीषण पाणी टंचाई निर्माण झाली असून या इथेही टँकरने पाणीपुरवठा करण्याची नाचक्की प्रशासनावर आली आहे. एकीकडे कोट्यावधी रुपयाचा निधी पाणी पुरवठा योजनेसाठी खर्च करायचा आणि दुसरीकडे उन्हाळ्यात टँकरने पाणीपुरवठा करण्याचा देखावा करायचा यामुळे जनतेमध्ये प्रचंड रोष व्यक्त केला जात आहे. दरवर्षी कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करायचा आणि तात्पुरती व्यवस्था करायची हा प्रकार प्रशासन करीत असल्याने शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी हा केवळ भ्रष्ट अधिकारी व ठेकेदार यांना जगण्यासाठीच खर्च करण्यात येतो की, काय असा तीव्र संताप जनता व्यक्त करीत आहेत.


देविदास खनपटे
मुख्य संपादक

## मेहकर तालुक्यातील चार गावांसाठी टँकर मंजूर

पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता मेहकर तालुक्यातील चार गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. यामध्ये हिवरा साबळे, पारडी, वरवंड व जवळा या ठिकाणी ठरवून दिल्याप्रमाणे टँकरव्दारे पाणी पुरवठा केल्या जाणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी रविंद्र जोगी यांनी दिली. हिवरा साबळे गावाला ३३५ पशुधन व १८१० लोकसंख्येसाठी एक टॅकर ४४ हजार ६६० लिटर्स पाणी पुरवठा करणार आहेत. पारडी गावाला ६३५ पशुधन व १३५० लोकसंख्येसाठी एक टॅकर ३६ हजार ५० लिटर्स पाणी, वरवंड गावाला १२०० पशुधन व २८५० लोकसंख्येसाठी एक टॅकर ८५ हजार लिटर्स पाणी व जवळा गावाला ७१२ पशुधन व १४६४ लोकसंख्येसाठी एक टॅकर ५३ हजार ७६० लिटर्स पाणी पुरवठा करेल.पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता या चार गावांसाठी पाणी पुरवठ्याकरिता टँकर मंजूर करण्यात आले आहे. टँकरने केलेल्या खेपांची ग्रामपंचायतीला नोंद घेण्यात यावी. नोंदवहीची तपासणी नियमितपणे गटविकास अधिकारी यांनी करावी. निवीदाधारकाने टँकर नादुरूस्त झाल्यास त्वरित दुसरे टँकर उपलब्ध करून द्यावे, असे उपविभागीय अधिकारी मेहकर यांनी प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

## संकल्प महिलांना आर्थिक सक्षम करण्याचा

८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. आपल्या देशातही हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आजच्या दिवशी वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा गौरव केला जातो. सर्वच क्षेत्रात महिला आज पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. असे कोणतेही क्षेत्र नाही की ज्यात महिला पुरुषांच्या मागे आहेत. राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, साहित्य,विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रात महिला आपल्या कर्तृत्वाचा झेंडा रोवताना दिसत आहे. पूर्वी चूल आणि मूल ही जी महिलांची ओळख होती ती आता पुसली गेली आहे. मागील शतकात किंवा अगदी काही दशकांपूर्वी म्हटले तरी चालेल महिला सक्षम नव्हत्या. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे महिला कायम दुर्लक्षित होत्या. सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांनी पहिल्यांदा घराचा उंबरठा ओलांडला. शिक्षणामुळे महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहू लागल्या. शिक्षणामुळेच महिला सक्षम झाल्या असे असले तरी आजही देशातील महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम आहेत का ? असा प्रश्न खेदाने विचारावा वाटतो. आज सर्वच क्षेत्रात महिला पुढे असल्या तरी त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत असे म्हणावे लागेल. आज खाजगी तसेच शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांचे प्रमाण खूप आहे. अनेक महिला उच्चपदावर कार्यरत आहेत. असे असले तरी नोकरी करणाऱ्या महिलांचा त्यांच्या पगारावर कितपत अधिकार आहे हा संशोधनाचा विषय आहे. नोकरी करणाऱ्या महिलांना स्वतःचा पैसा स्वतः खर्च करण्याचा अधिकार नाही. आपल्या देशातील सर्वाधिक महिला या घरकामात गुंतलेल्या असतात. त्यांना आर्थिकदृष्ट्या पतीवर अवलंबून राहावे लागते. या महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत. समाजात माणूस म्हणून जगायचे असेल तर आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे आवश्यक आहे. मध्ययुगात स्त्री ही एक असहाय्य व्यक्तिमत्त्व की जिला स्वतःचे अस्तित्वच नाही, अशी प्रतिमा समोर आली त्याला छेद देण्याचा प्रयत्न अजूनही चालू आहे. पुरुषप्रधान संस्कृती आल्यापासून पुषांच्या लेखी महिलांचा दर्जा दुय्यम होत गेला. वेतनासंबंधी भेदभाव, स्वयंरोजगार, अर्थसाहाय्याचा अभाव, विनावेतन काम व बेरोजगारी, कुटीर उद्योगात मालकी हक्क नसणे अशा अनेक कारणांमुळे महिलांचे आर्थिक स्थान पुरुषांपेक्षा दुय्यम राहिले आहे. आज २१ व्या शतकातही तो दुय्यमच आहे. हा दुय्यम दर्जा जाऊन महिलांना पुरुषांच्या बरोबरीने मानाचे स्थान मिळवून द्यायचे असेल तर त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेच लागेल. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायचे असेल तर महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला हव्यात. महिला मंडळे, स्वयंसहाय्यता बचत गट, विविध संस्था यांच्या माध्यमातून महिलांनी एकत्र येऊन आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी समाजानेही व्यासपीठ उपलब्ध करुन द्यायला हवे. पुरुषांनीही आपली पुरुषी मानसिकता सोडून महिला सक्षमीकरणासाठी प्रयत्न करायला हवेत. महिलांच्या पगारावर महिलांचाच अधिकार असायला हवा. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करुनच आपण देश सक्षम करु शकतो. देशाचा विकास करायचा असेल तर महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करायलाच हवे.

# जिल्हा कारागृहातील बंद्यांना स्वयंरोजगाराचे धडे: बंद्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** कारागृहातुन मुक्त झाल्यानंतर त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता यावे, या उद्देशाने बुलढाणा जिल्हा कारागृहातील बंद्यांकरीता स्वयंरोजगाराचे धडे देण्यात येत आहे. त्याअनुषंगाने येथील सेंट ग्रामिण प्रशिक्षण संस्थाच्या माध्यमातुन सहा दिवसांचे अगरबत्ती आणि धुपबत्ती बनविणाबाबतच्या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाला बंद्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

बुलढाणा जिल्हा कारागृहामध्ये ३५३ न्यायाधिन बंदी बंदीस्त आहे.





या बदीस्त बंद्यांसाठी प्रशिक्षण देण्यात येत असून पहिल्या तुकडीमध्ये ३२ बंद्यांनी फास्ट फुड बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. तर दुसऱ्या तुकडीसाठी दि. १ ते ६ मार्च या कालावधीत अगबत्ती व धुपबत्ती बनविण्याचे प्रशिक्षण विजय धर्माळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पुर्ण झालेले आहे. प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी बंद्यांना संस्थेमार्फत प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच बंद्यांना भविष्यात उपजिवीकेसाठी निश्चितच फायदा होणार आहे. सेंट ग्रामीण प्रशिक्षण संस्था बुलढाणा यांचे मार्फत कारागृहामध्ये बंद्यांकरीता पुढील प्रशिक्षण शिबिरामध्ये नर्सिग कोर्स, टेलरींग कोर्स, मोटार रिवायडींग असे विविध प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार आहेत.

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजनाकरीता कारागृह अधीक्षक संदीप पां. भुतेकर, वरीष्ठ तुरंगाधिकारी मेघा बाहेकर, तुरुंगधिकारी एम.एस. पाटील, सेंट ग्रामिण प्रशिक्षण संस्थाचे संचालक संदीप पोटे, श्रीकृष्ण राजगुरे तसेच सर्व कारागृह अधिकारी व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## ज्येष्ठ मराठी अभिनेत्री प्रेमा साखरदांडे यांचे निधन

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठी सिनेविश्वातून एक दु:खद बातमी सम ोर आली आहे. ज्येष्ठ मराठी अभिनेत्री प्रेमा साखरदांडे यांचे निधन झाले आहे. अनेक नाटकं, मराठी मालिका, मराठी चित्रपट व हिंदी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या प्रेमा साखरदांडे यांची प्राणज्योत म ालवली आहे. ज्येष्ठ अभिनेत्री प्रेमा साखरदांडे यांचे निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. प्रेमाताई नावाने मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीत ओळखल्या जाणाऱ्या प्रेमा साखरदांडे या मास्टर्स व्हॉइस नावाने ध्वनिमुद्रिका तयार करणाऱ्या वसंतराव कामेरकर यांच्या कन्या होत. त्यांच्या बहिणी ज्योत्स्ना कार्येकर, सुलभा देशपांडे आणि आशा दंडवते याही अभिनयक्षेत्रात होत्या.

## महाविद्यालय स्तरावरील मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली काढण्याचे आवाहन

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शैक्षणिक वर्ष सन २०२४-२५ या वर्षातील महाडीबीटी प्रणालीवरील महाविद्यालयस्तरावरील अनुसूचित जाती प्रवर्गाचे मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे अर्ज मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहे. सदर प्रलंबित अर्ज तपासणी करुन दि. १० मार्च २०२५ पर्यंत निकाली काढावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त भाऊराव चव्हाण यांनी केले.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे अनुसूचित जाती प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने,राजश्री छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यवसाय पाठ्यक्रमाचे संलग्न असलेल्या वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन व व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजनांचा लाभ देण्यात येतो. सदर योजनेंतर्गत महाडीबीटी प्रणालीवर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन केलेले अर्ज महाविद्यालयांना पाठविण्यात येतात. महाविद्यालयांनी प्राप्त अर्जांची तपासणी करुन शिष्यवृत्तीकरिता पात्र अर्ज समाज कल्याण कार्यालयास पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्रृटी असलेले अर्ज विद्यार्थ्यांच्या लॉगीनला परत करणे आवश्यक आहे. परंतु सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षातील २ हजार ८२७ विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयस्तरावर प्रलंबित आहेत.

यामध्ये हर्ष स्कुल ऑफ नर्सिंग खामगांव येथील ९७, डॉ. राजेंद्र गोडे जीएनएम नर्सिंग स्कुल सागवान बुलढाणा येथील ९२, एसएमएमबीएस सरस्वती नर्सिंग स्कुल चिखली येथील ८२, श्री. शिवाजी आर्ट अँड सायन्स कॉलेज चिखली येथील ७६, श्रीमती सुरजदेवी रामचंद्र मोहता महिला महाविद्यालय खामगांव येथील ७३, पदमश्री डॉ. व्ही बी कोलते कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मलकापूर येथील ५७, डॉ. लाहोटी नर्सिंग कॉलेज सुलताना लोणार येथील ५३, माऊली ग्रुप ऑफ इन्सिटयुट कॉलज ऑफ इंजिनिअरींग अँड टेक्नोलॉजी शेगांव येथील ३५, विद्या संच्चिदानंद फुलेकर महाविद्यालय बुलढाणा येथील ३३ व राजश्री शाहु कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग बुलढाणा येथील ३१ अर्ज प्रलंबित आहे.

महाविद्यालयांनी महाविद्यालयस्तरावर प्रलंबित असलेले अर्ज तपासणी करुन पात्र अर्ज सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्या लॉगीनला दि. २५ ऑगस्टपर्यंत पाठवावे. त्रृटी असलेले अर्ज विद्यार्थी लॉगीनला परत करावेत. महाविद्यालयांनी मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या लाभापासुन वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन समाज कल्याण सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे.

# अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवारी फोस्टेक प्रशिक्षणाचे आयोजन

### हॉटेल, केटरींग व्यवसाय चालकांनी सहभागी होण्याचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अन्न व औषध प्रशासन कार्यालयामार्फत शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी सकाळी १०.३० ते ३ वाजेदरम्यान हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग व्यावसाय चालकांसाठी फोस्टेक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण मोफत असून एमईएस फार्मसी कॉलेज, राम नगर मेहकर येथे होणार आहे. जिल्ह्यातील हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग अन्न व्यवसाय चालकांनी मोठ्या संख्येने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन सहायक आयुक्त प्रमोद पाटील यांनी केले आहे. फोस्टेक प्रशिक्षण हा भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाचा उपक्रम असून भारत सरकार आणि अन्न सुरक्षा आयुक्त यांचे निर्देशानुसार घेण्यात येत आहे. हॉटेल, रेस्टॉरंट, आणि केटरिंग व्यावसाय चालवण्याऱ्यांसाठी प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त असून केवळ अन्न सुरक्षा सुनिश्चित होत नाही, तर व्यावसायाची विश्वासार्हत आणि गुणवत्ता देखील वाढते. प्रशिक्षणाचा उद्देश अन्न सुरक्षा आणि स्वच्छता याबाबत जागरुकता निर्माण करणे व अन्न व्यावसाय चालकांना योग्य प्रशिक्षण देणे हा आहे.

फोस्टेक प्रशिक्षणामुळे अन्न सुरक्षा मानकांचे योग्य पालन करणे सोपे होते, ग्राहकांपर्यंत सुरक्षित आणि दर्जेदार अन्न पोहोचवण्यासाठी मदत मिळते. तसेच ग्राहकांना हॉटेल किंवा रेस्टॉरंटमध्ये अन्न सुरक्षा आणि स्वच्छतेच्या सर्व नियमांचे पालन होत आहे, याची खात्री मिळते. स्वच्छता, अन्न हाताळणी, आणि आपात्कालीन स्थिती हाताळण्याबद्दल कर्मचारी अधिक जागरुक आणि प्रशिक्षित होतात. अन्न सुरक्षा मानकांचे पालन न केल्यास व्यवसायाला दंड किंवा परवाना रद्द होण्याचा धोका असतो. प्रशिक्षणामुळे हे धोके कमी होतात. प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर सहभागी अन्न व्यवसाय चालकाना फोस्टेक प्रमाणपत्र दिले जाते.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या अधिकृत प्रशिक्षण भागीदारामार्फत प्रशिक्षण दिले जाणार असून सदर प्रशिक्षण पूर्णपणे मोफत आहे. प्रशिक्षणात सहभागी होण्यासाठी हॉटेल, रेस्टॉरंट, केटरिंग व्यवसायाची परवाना प्रत, व्यवसायातर्फे सहभागी होणारे मालक, शेफ, सुपरवायजर यांचे आधार कार्ड, स्वत:चा पासपोर्ट फोटो, हात गाडीचा फोटो व पॅन कार्ड ची कॉपी पॅन नसल्यास तसे शपथपत्र आणावे.

# महिला ही शोषित नव्हे तर उद्धार करणारी आदिशक्ती

### जागतिक महिला दिन विशेष

मनुष्य निर्मिक तु, प्रयत्नांना लाभलेली उन्नती तु, आजच्या युगाची प्रगती तु.. स्त्री आहे म्हणून विश्व आहे, स्त्री आहे म्हणून सुंदर नाती आहे, स्त्री आहे म्हणून सर्व नात्यात प्रेम आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिन' हा दरवर्षी ८ मार्च रोजी साजरा केला जाणारा एक सुट्टीचा दिवस आहे. हा दिवस लिंग समानता, पुनरुत्पादक हक्क आणि महिलांवरील हिंसा आणि अत्याचार यासारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करतो. महिलांच्या हक्क चळवळीतील केंद्रबिंदू म्हणून हा दिवस पाळला जातो. हा दिवस २० व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात उत्तर अमेरिका आणि युरोपमधील कामगार चळवळींमधून सुरू झाला.जागतिक महिला दिन हा महिलांच्या सामाजिक, आर्थिक ,सांस्कृतिक आणि राजकीय कामगिरीचा उत्सव साजरा करणारा जागतिक दिवस आहे. एकेकाळी मातृ सत्ता पद्धतीत महिलांना सन्मानाचे स्थान होते परंतु पुरुषप्रधान संस्कृती आल्यानंतर हळूहळू महिलांचे सन्मानाचे स्थान कमी होत गेले.जागतिक दिवस महिलांवरील अन्याय,अत्याचार कमी करण्यासाठी कृती करण्याचे आवाहन करण्यासाठी साजरा केला जातो. १९०८ न्यूयॉर्कमध्ये ८ मार्च रोजी पंधरा हजार महिलांनी रस्त्यावर उतरून एक मोठे आंदोलन केले होते. या आंदोलनात प्रमुख तीन मागण्या होत्या, पहिली मागणी



मतदानाचा अधिकार, दुसरी मागणी कमी तासाची नोकरी आणि तिसरी मागणी चांगल्या पगाराची नोकरी मिळावी, अशी होती. अमेरिकेत महिलांना मतदानाचा अधिकार देण्यासाठी १४४ वर्ष वाट पहावी लागली. तर, ब्रिटनमध्ये महिलांना १०० वर्ष वाट पहावी लागली. भारतीय संविधानाने कलम ३२६ अंतर्गत मतदानाचा अधिकार हा भारतातील घटनात्मक अधिकार आहे.अठरा वर्षापेक्षा जास्त वयाच्या सर्व नागरिकांना त्यांचे लिंग जात, धर्म, किंवा वर्ग विचारात न घेता मतदानाचा अधिकार आहे. कामाचे तास म्हणजे एखाद्या व्यक्तीने सशुल्क कामावर खर्च केलेला कालावधी. भारतात कामगार कायद्यानुसार कर्मचाऱ्यांसाठी कामाचे तास निश्चीत केले जातात, जे कुशल व अकुशल कामगारांना लागु होतात.भारतातील कर्मचारी एका प्रमाणित वर्क आठवड्यात ४८ तास काम करु शकतात. दररोज ८ ते ९ तास चांगल्या पगाराची नोकरी महिलांना मिळावी ही मागणी म्हणजे पुरुष व स्त्रियांच्या पगारात, मजुरीत फरक आहे. पुरुषासारखे महिला काम करत असेल तर, समान काम ,समान पगार असायला हवा. रशियाच्या महिलांनी महिला दिवस साजरा करत पहिल्या विश्ववयुध्दाचा विरोध केला होता. ब्रेड अॅन्ड पीससाठी रशियन महिलांनी १९१७ मध्ये आंदोलन केले, तर, युरोप मध्येही महिलांनी ८ मार्च रोजी शांतीचं समर्थन करण्यासाठी रॅली काढली,१९५८ मध्ये क्रिस्टीना एफ लुईस यांनी त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे प्रथम आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा केला. जागतिक पातळीवर वेगवेगळ्या ठिकाणी प्रयत्न सुरू होते, याच विविध कारणाने संयुक्त राष्ट्राने ८ मार्च १९७५ रोजी जागतिक महिला दिनाला मान्यता दिली. २०१७ मध्ये सर्व्हेत महिला पुरुषांमधील असमानता संपन्यासाठी अजुन १०० वर्ष लागण्याची शक्यता दर्शविली, आजही महिला व मुलींच्या सुरक्षेतेचा प्रश्न आहे, स्त्री घरात दारात, समाजात सुरक्षीत नाही, आजही महिला विरोध करायला घाबरतात, सोशिअल मीडियावर महिला व मुलीवर होणारा अत्याचार, बलात्कार, लैंगिक शोषण, समाजात एक चांगले वातावरण निर्माण झाले पाहिजे, प्रेम, बंधुभाव व नैतिकता वाढली पाहिजे, कारण स्त्री सुरक्षीत तर राष्ट्र सुरक्षित व सक्षम राहील, राष्ट्रविकासात महिलांचा वाटा व योगदान महत्वाचे आहे. मातृसत्ताक पद्धती पासून आतापर्यंत झालेल्या बदलाने महिलांना एक सक्षम बनवण्याचे काम केलेले आहे भारतीय संविधानाने महिलांना विशेष अधिकार दिल्याने भारताचे सर्वोच्च स्थानी राष्ट्रपती म्हणून महिला विराजमान आहेत.त्याचबरोबर देशाच्या संसदेत अनेक खासदार महिला आहेत. जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत आदी विविध शासकीय व प्रशासकीय प्रणालीमध्ये सुद्धा महिलांनी आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमटवून एक उत्तम प्रशासक म्हणून आपली नवी ओळख केली आहे. त्यामुळे महिला ह्या शोषित नव्हे तर, उद्धारकरत्या आदिशक्ती असल्याचा प्रत्यय अधिक काळापासून आतापर्यंत येत असल्याचा अनुभव आहे. महिला ह्या आदिशक्तीच आहेत असे म्हणणे हे अतिशय अतिशय एकटीचे न ठरता त्यांच्या सन्मानाचे ठरेल असे मत सर्वसामान्य तथा सुज्ञ नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे. आई, बहीण, पत्नी, मैत्रीण आदी नात्यात असलेल्या महिलेचे स्थान हे प्रत्येक वेळी श्रेष्ठ राहिले असल्याचे आतापर्यंतच्या इतिहासावरून दिसून येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# ‘उमेद’ विभागीय, जिल्हा मिनी सरस महोत्सवाची सांगता

## सांस्कृतिक कार्यक्रम, विक्री व प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी :** ग्रामविकास व पंचायत राज विभागाअंतर्गत उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद बुलढाणाच्या वतीने विभागीय, जिल्हा व मिनी सरस चे आयोजन दि. २८ फेब्रुवारी ते ४ मार्च २०२५ दरम्यन जिजामाता प्रेक्षगार क्रीडा व व्यापारी संकुल बुलढाणा येथे करण्यात आले होते. या महोत्सवामधील सांस्कृतिक कार्यक्रम, बचत गटातील उत्पादित साहित्याची विक्री व प्रदर्शनीला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद लाभला.

राजमाता विभागस्तरीय सरस तथा बुलढाणा जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शनीचा शुभारंभ केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते दि. २८ फेब्रुवारी रोजी झाला. उद्घाटनाच्या दिवशी सायंकाळी अप्सरा आली फेम अभिनेत्री सोनाली कुलकर्णी यांच्या आगमनाणे उमेदच्या सरस प्रदर्शिनीस प्रेक्षकांची गर्दी उफाळली होती. तसेच त्यांनी आपल्या साध्या व सरळ स्वभावातून बचत गटातील महिलानी बनविलेल्या वस्तु व खाद्य पदार्थाचे काय महत्व आहे, तसेच त्यांचे उत्पादन घेण्यास समस्त जनतेस आवाहन केले होते. यावेळी उमेद मार्ट या ऑनलाइन प्लॅटफॉर्मबाबतची माहिती दिली. तसेच प्रेक्षकांच्या आग्रहावर त्यांच्या जोडीला बोलविलेल्या बुलढाण्यातिल प्रसिद्ध ए. जे. डान्स क्लासच्या नृत्य कलाकारांसोबत अप्सरा आली’ गाण्यावर ठेका धरला. आपल्या मोहक अंदाजाने उपस्थित रसिकांना भारावून टाकले.

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी दि. १ मार्चला बापू चव्हाण प्रस्तुत गजर महाराष्ट्राचा ह्या महाराष्ट्रातील सर्व लोककलेचा संगमातून तसेच आपल्या कलेतून समस्त रसिकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी दि. २ मार्च रोजी स्वप्नील आराख प्रस्तुत ‘स्वर मिलाप टीम’ च्या धमाकेदार हिन्दी व मराठी गाण्याची मेजवानी प्रस्तुत करून कार्यक्रमाची शोभा द्विगुणित केली. दि. ३ मार्च रोजी महाराष्ट्राचा शाहीरीबाणा म्हणून नावाजलेले युवाशाहीर विक्रांतसिंग राजपुत व त्यांच्या टीमने पोवाडा व स्फूर्तीगीतांचा कार्यक्रमाने मराठी माणसांच्या अंगाला शहारे येतील अशा निनादाणे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण आयुष्याची महती व संघर्ष आपल्या पोवाड्यातून व्यक्त केला. त्यानंतर कार्यक्रमाला चार चांद लागले ते म्हणजे बुलढाणा जिल्ह्या परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी आपल्या अंतरी दडलेल्या कलेचा नमूना तबला व ढोलकी वाद्य वाजवून उपस्थितगनाचे लक्ष्य वेधून घेतले.

महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी दि. ४ मार्च रोजी दुपारी मराठी अभिनेता तसेच आगामी मराठी चित्रपट ‘सुनबाई लय भारी’ चे रोहण पाटील यांनी सर्व स्टॉल धारक यांच्याशी हितगुज केली. समरोपा अगोदर उत्कृष्ट ३ स्टॉलला पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्ती पत्रक देऊन स्टॉल धारक महिलेचा सन्मान करण्यात आले. यामध्ये जळगाव जामोद, सूनगाव येथील भिमाई समूहाच्या सफेद मुसळी पावडर या उत्पादनाला प्रथम क्रमांक व ११ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले, शेगांव तालुक्यातील माता रमाई यांच्या खानावळी स्टॉलला द्वितीय क्रमांक व ७ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले. मलकापुर तालुक्यातील हिरकणी समूहाला सर्व प्रकारचे पापड या उत्पादनाला तृतीय क्रमांक व ५ हजार रुपयांचे बक्षीस मिळाले. तसेच महोत्सवामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, आयोजन आणि नियोजनात सहभागी असणाऱ्यामध्ये अमोल जाधव यांचा ए.जे. डांस ग्रुप, बापू चव्हाण यांचा गजर महाराष्ट्राचा ग्रुप, स्वप्नील आराख यांचा स्वर मिलाप ग्रुप, युवा शाहीर विक्रांतसिंग राजपूत तसेच धनश्री अण्णा पाटील, संदीप मोरे, नितीन दळवी यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आले. प्रकल्प संचालक राजेश इंगळे, जिल्हा अभियान व्यवस्थापक विक्रांत जाधव व त्यांच्या जिल्हा ग्रामीण यंत्रणा व उमेद अभियानातील सहकाऱ्यांच्या उत्तम नियोजनामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

जिल्ह्यातील उमेद अभियानंतर्गत स्थापन झालेल्या ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी बनविलेले उत्कृष्ट व दर्जेदार उत्पादनाची तसेच उत्तम रित्या घरच्या खमंग चविणे बनविलेल्या खाद्य पदार्थांचे स्टॉल महोत्सवामध्ये दि. २८ फेब्रुवारी ते ४ मार्चपर्यंत लावण्यात आले होते. यामध्ये १५० स्टॉलच्या माध्यमातून महिलानी स्वतः तयार केलेल्या दर्जेदार खाद्य पदार्थ, साडी, महिलापयोगी वस्तु, हस्तकला वस्तु, मूर्ती, आरोग्य विषयक काही प्रॉडक्ट अशा इतर घरघुती वस्तु उत्कृष्टरित्या पॅकिंग आणि लेबलिंग करून महिलानी स्टॉल मध्ये विक्री करीता ठेवण्यात आलेले होते. या स्टॉलला नागरिकांचा भरभरून प्रतिसाद देत खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतला. खवय्य प्रेमींचा उत्साह पाहता रात्री उशिरापर्यंत स्टॉल महिलांना सुरू ठेवावा लागला. महिलांना महोत्सवामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक लाभ होऊन महिलांचा आनंद व्दिगुणीत झाला. हीच उमेद अभियानाच्या दहाव्या सूत्राची पावती म्हणावी लागेल.

## संक्षिप्त...

### कल्याणमधील सुभेदारवाडा शाळेत नैसर्गिक रंगांची कार्यशाळा संपन्न



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी कोरड्या रंगपंचमीचे महत्व तसेच रासायनिक रंगांचा आपल्या शरीरावर घातक परिणाम होतो. ज्यामुळे आपल्याला तसेच निसर्गातील अनेक घटकांना हानी पोहचू शकते. त्यामुळे पर्यावरणपूरक रंगपंचमी साजरा करण्याचे आवाहन दरवर्षी करण्यात येते. या पार्श्र्वभूमीवर कल्याणमधील सुभेदार वाडा कट्टा आणि पर्यावरण दक्षता मंच यांच्या संयुक्त विद्यामाने नैसर्गिक रंगाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. पर्यावरणपूरक रंगांची निर्मिती कशी करायची, निसर्गात सहज उपलब्ध असणाऱ्या विविध गोष्टींचा वापर करुन पर्यावरणपूरक रंग घरच्या घरी कसे बनवले पाहिजेत याचे प्रशिक्षण देण्यात आले.

### विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून प्रयत्न केले जातायत; अनिल परब यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विरोधकांचा आवाज दाबण्यासाठी सत्ताधाऱ्यांकडून प्रयत्न केले जातायत असा आरोप आमदार अनिल परब यांनी केला. ते पुढे म्हणाले की, मी खुप छोटा माणूस आहे. कुठे संभाजी महाराज आणि कुठे मी, त्यांचा धर्म बदलण्यासाठी छळ करण्यात आला आणि माझा पक्ष बदलण्यासाठी यात मी त्याच्यासोबत तुलना करणंच शक्य होत नाही. मी अतिशय नगण्य आहे. धुळीच्या कणा ऐवढा ही नाही. जाणून बुजुन असं करायचं आणि विरोधकांचा आवाज दाबायचा असा प्रयत्न सत्ताधाऱ्यांचा सुरु आहे. मी राज्यपाल्यांच्या अभिभाषणावर कोणतही चुकीचे वक्तव्य केले नाही. योगेश कदम यांनी माफी मागायचा प्रश्र्नचं येत नाही. मी संभाजी महाराजांचा तर अपमान करुनच शकत नाही, मी हाडाचा शिवसैनिक आहे. शिवाजी महाराज माझं आराध्य दैवत आहे. त्यांचा अपमान करणाऱ्यांना आम्ही शिक्षा देण्यात पुढे असतो, त्यामुळे आमच्या कडून असं होऊच शकत नाही. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज आमचे दैवत आहे. विरोधक टीका ही कोरटकर आणि सोलापुरकरला वाचवण्यासाठी हे षडयंत्र आहे. असा आरोप आमदार अनिल परब यांनी केला आहे.

## आन्वा येथे तरुणावर झालेल्या अमानुष अत्याचाराच्या विरोधात

# वंचित बहुजन आघाडीचे निदर्शने




**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** जालना जिल्ह्यात अलीकडे मागासवर्गीय भटक्या तसेच ओबीसी समाजावर अत्याचार वाढले आहेत. सामाजिक तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत, कायदा हातात घेणाऱ्यांना कायद्याचे भय उरलेले नाही, पोलीस यंत्रणेचा गुन्हेगारावर वचकच राहिलेला नाही. जिल्ह्यात असुरक्षित असे वातावरण निर्माण झाले आहे. भोकरदन तालुक्यातील अमानुष अत्याचार प्रकरणी कठोर कारवाई व्हावी, यासाठी वंचित बहुजन आघाडीने आज क्रांती चौकामध्ये निदर्शने केली.

आन्वा येथील कैलास बोराडे या मेंढपाळ समाजाच्या तरुणास महाशिवरात्रीच्या दिवशी महादेव मंदिरात गेल्याच्या कारणावरून लोखंडी सळई गरम करून त्याच्या शरीरावर चटके दिले तसेच क्रुरपणे छळ करून मारहाण करण्यात आली. ही घटना माणुसकीला काळीमा फासणारी असून, निंदनीय आहे. अत्याचाराच्या घटना कायदा सुव्यवस्थेचा प्रश्र्न उपस्थित होत आहे. या घटनेने महाराष्ट्र संपूर्ण हादरुन गेला आहे. त्यामुळेच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने क्रांती चौक येथे तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

# २ हजार ९७९ जन्मप्रमाणपत्र रद्द

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** मालेगावमध्ये बांगलादेशी लोकांना देण्यात आलेले २ हजार ९७९ जन्मप्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहे.अशी माहिती किरीट सोमय्या यांनी माध्यमांशी बोलताना दिली.



यावेळी बोलताना किरीट सोमय्या म्हणाले की, बांगलादेश जन्म प्रमाणपत्र प्रकरणावर आज मी नाशिकचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांची भेट घेतली आहे. मालेगाव चौकशीवर मी समाधानी आहे,अनेकांना यात अटक झाली आहे. १७ जिल्ह्यात मी आतापर्यंत या मुद्द्यावर फिरलो आहे. एक प्रमाणपत्रावर जवळपास १ लाख रुपये खर्च करण्यात आला. जवळपास २ लाख बांगलादेशी लोकांना प्रमाणपत्र देण्यात आले आहे. निवडणूक काळात हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. कळवण परिसरात १८१ बांगलादेशी लोकांना किसान सन्मान योजनेचा लाभ देण्यात आले आहेत.काही हफ्ते त्यांच्या खात्यात गेले आहेत. पुढच्या काही तासात याही प्रकरणावर गुन्हा दाखल होणार आहे. मालेगाव मधून आलेले सर्व अर्जावर नायब तहसीलदारांना दिले होते. मालेगाव मध्ये बांगलादेशी लोकांना देण्यात आलेले सर्व २ हजार ९७९ जन्मप्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहेत. २०० कोटी रुपये जवळपास प्रमाणपत्र घेण्यासाठी खर्च करण्यात आले आहेत. मालेगाव मधील लोकांनी मला होळीसाठी आमंत्रण दिले आहे. होळीच्या दिवसी मालेगावमध्ये रोहिग्यांची फोटो जाळून निषेध करण्यात येणार आहे.अशी माहिती भाजपचे नेते संजय किरीट सोमय्या यांनी दिली.

# मराठी माणसाचा अपमान सहन करणार नाही : अविनाश जाधव यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** भैय्याजींनी सरळ जावं आणि गुजराती माणसाच्या घरी भांडी घासावी. असे मत मनसे नेते अविनाश जाधव यांनी व्यक्त करत मराठी माणसाचा अपमान सहन करणार नाही, असा इशाराही यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना दिला. ते पुढे म्हणाले की राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाहक भैया जोशींना भारताची प्रांतवार रचना झाली ते मान्य नसावी किंवा त्यांच्यावर विश्र्वास नसावा कारण त्यांच्यावर त्यांच्या विश्र्वासावा नसावा, ज्यावेळी या देशात प्रांतवार रचना झाली त्याच वेळेला महाराष्ट्र आणि मुंबई ही मराठी माणसाची ते त्याचवेळी जाहीर झालेल आहे.परंतु, यांच्या सारखी लोकं हे सतत येतात आणि मराठी माणूस आणि इतर भाषिक यांच्यात वाद लावण्याचे काम हे करत असतात. या मागचा उद्देश हे निवडणूकच आहे. जेव्हा निवडणूक जवळ येतात तेव्हा हे प्रांतिक वाद, भाषावाद तयार करण्याचं काम करत असतात. पुन्हा एकदा जोशी यांनी हे केले. पुन्हा सांगतो महाराष्ट्रात मुंबईमध्ये मराठी चालणार बाकी कोणी चालणार नाही. कोणी भैय्याजींनी सांगो की, कोणी देशाचे महत्त्वाच्या नेत्यांनी सांगितले. घाटकोपर, मुंबई आणि महाराष्ट्र हे मराठी माणसाचे आहे. आणि ते मराठी माणसाचाच राहणार आहे. मी पुन्हा सांगतो त्यांनी माफी मागितली नसेल तरी निवडणुकीच्या वेळेला येऊन मराठी माणसाच्या पाया पडतात. खरं तर निवडणुकीसाठी हे सगळं चालू आहे.भैय्याजींनी सरळ जावं आणि गुजराती माणसाच्या घरी भांडी घासावी. असेही मत मिळणार आहे. हे सगळं मतांसाठी तुम्ही करत आहात आणि बाकी तुमचा काही उद्देश नाही. आमच्यात एकोपा असताना भांडण लावायचे काम आणि भांडण लावतात म्हणतात मनसे वाले आम्हाला मारतात म्हणून हे वक्तव्य भारतीय जनता पार्टी किंवा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा लोकांनी केले नाही.



तर, हे वाद होतील का ? खरं त्यांची इच्छा आहे की गुजरात्यांना माराव आणि इतर भाषिकांना माराव आणि त्यांना मत मिळणार अशी इच्छा आरएसएस आणि भारतीय जनता पक्षाची असते. तुमचा गुजराती, मराठी वर आणि इतर भाषिकांवर प्रेम नाही आहे. त्यांचं प्रेम फक्त सत्तेवर आहे. सत्तेसाठी हे सगळं चालू आहे.गुणरत्न सदावर्ते हा फालतू माणूस आहे. खरंतर याचं गुणवंत ज्यांनी नाव ठेवल तो मूर्ख होता.त्या मूर्खाचं नाव गुणवंत ठेवणं हा मोठा मूर्खपणा आहे. खरंतर वाल्मिक कराडला तो साहेब म्हणतो जर वाल्मिक कराडला साहेब म्हणत असेल तर, या कुटुंबाच्या घरातला माणूस गेला आहे. त्यांनी याला चपलीने मारले पाहिजे. महाराष्ट्राने सगळ्यात जास्त मुभा घेतलेली आहे. गुणरत्न सदावर्ते सारखे जे फालतू लोक आहेत ते त्यांच्या आकाला खुश करण्यासाठी कुठल्याही विषयावर बडबडतो. याचा काहीही संबंध नाही. गुणरत्न सदावर्तेनी राज ठाकरेंवर बोलायला जाऊ नये, त्याची लायकी नाही आहे. तुम्हाला घराच्या बाहेर येऊन लोक मारतात, अख्खा महाराष्ट्र येऊन तुम्हाला शिव्या देतो.घाटकोपर मुंबईपासून वेगळी केली. गिरगाव मराठी माणसाचा, दादर हा मराठी माणसाचा, तुम्ही कोण आहात? जोशी कोण आहेत ठरवायला? मुंबईचा विभाग कुठला कोणाचा आणि कुठल्या भाषेचा हे जाऊन मुंब्रात बोला हिम्मत असेल. तर, अशा ठिकाणी येऊन बोलतात तिथे तुमची वोट बँक आहे.गुजराती माणसांना देखील सल्ला आहे की, त्यांची वक्तव्य नीट ऐका. हे असं वक्तव्य का करतात? आणि याच नुकसान कोणाला होतं? गुजरात मध्ये जाऊन सांगत नाही. महाराष्ट्र हे गुजरातच भाग आहे. तुम्ही येऊन सतत का आम्हाला चिडवतात? का गुजराती आणि मराठी वाद लावत आहे? हा गैरसमज आहे का ? बुध्दी घरी घेऊन आले होते का ? आत तुम्हाला गरज आहे ठाण्यातील मेंटल हॉस्पिटलची मोहन भागवत हे खूप मोठे आहेत. आम्ही सल्ला देणारे कोण आहोत? पण त्यांनी अशा माणसावर तोंडावर ताबा बसवावा. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा आदर आहे. आमच्या मराठी भाषेवर अशाप्रकारे बोलणार तर आम्ही आदर काय शिजून खाणार का ? तुमच्या आदर पोटी मराठी माणसाचं अपमान सहन करणार नाही हे नक्की. मनसेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा आहे. आम्ही सगळेच जाणार आहोत. संपूर्ण नेत्यांनी महाराष्ट्रातले सर्वच लोक संपूर्ण भाषण ऐकायला येणार आहेत. असे मत मनसे नेते अविनाश जाधव यांनी व्यक्त केले.



# वैद्यकीय जैविक कचरा प्रकरणाचा तपास संशयाच्या भोवऱ्यात

## आरोग्य विभागाकडून चौकशीत एकाचा सुगावा मात्र कारवाई नाही



# जैविक कचरा आगीचे डॉक्टर्ससह औषधी विक्रेत्यांना चटके

आरोग्य विभागाकडून चौकशी : कारवाईकडे लागले लक्ष

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/का. प्रतिनिधी :** वैद्यकीय जैविक कचरा पर्यावरण व माणव, प्राणी जीवनासाठी घातक असल्याने त्याची विल्हेवाट लावण्याचे कडक नियम आहेत. मात्र, सर्व नियमांना ठेंगा दाखवत अज्ञात व्यक्तींनी २ फेब्रुवारीच्या मध्यरात्री डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळच वैद्यकीय जैविक कचरा जाळल्याची घटना घडली. त्यानंतर बुलढाणा आरोग्य विभागाच्या पथकाने ६ फेब्रुवारी रोजी पंचनामा करून डोणगाव येथील अकरा हॉस्पिटलची तपासणी केली आहे. या अहवालात आता काय घबाड बाहेर येते याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.जैविक कचऱ्याचे आग आता हॉस्पिटलचा औषधी विक्रेत्यांपर्यंत पोहचून अधिकारी काय अहवाल देतात आणि दोषी डॉक्टरवर काय कारवाई करतात. याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.

डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ अज्ञात व्यक्तीने जैविक कचरा जाळला होता. यामध्ये सलाइन, बॉटल, सिरिन्ज, इंजेक्शन, व्हाईल, सोनोग्राफी रिपोर्ट, रक्ताने माखलेले कपडे, आधार कार्ड झेरॉक्स व अन्य साहित्य होते. या कचऱ्याला आग लावल्यानंतर गुरुवारी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बलकार, मेहकर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वप्निल चव्हाण, डॉ. राठोड, डॉ. राम गायकवाड यांनी पाहणी करून पंचनामा केला. तसेच शहरातील अकरा हॉस्पिटलच्या हॉस्पिटलची तपासणी केली असून या तपासणी अहवालात अनेक तपासणीमध्ये अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या असल्याची चर्चा सुरू आहे. डॉक्टर वर्ग अधिकारी वर्गाशी हाताशी धरून गोरगरीब जनतेला मनमानीप्रमाणे लुटत अनेक कामे नियमबाह्य करीत असल्याचा प्रकार डोणगाव,मेहकर परिसरात सुरू असल्याची चर्चा आहे. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे डॉक्टरांनी मात्र, सामान्य जनतेला वेटीसी धरून त्यांची मनमानी आर्थिक लूट केली जात असल्याची चर्चाही आहे. डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती जवळच जैविक कचरा टाकून जाळण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने मेहकर डोणगाव परिसरात आरोग्य विभागाच्या नियमाला ठेंगा दाखविला जात असल्याचे दिसून येत आहे. अधिकारी कर्मचारी हे डॉक्टरांच्या कृत्याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करीत असल्याने डॉक्टरांनी डोणगाव परिसरातील डॉक्टरांनी अनेक नियमबाह्य केली जात असल्याची चर्चा आहे.जैविक कचरा प्रकरणात जिल्हा आरोग्य आरोग्य विभागाच्या वतीने डोणगाव येथील तब्बल ११ हॉस्पिटलची चौकशी केल्याचे वैद्यकीय अधिकारी राम गायकवाड यांनी सांगितले आहे त्यामुळे आता जैविक कचरा जळल्याची आग डॉक्टर्ससह औषधी विक्रेतेपर्यंत पोहोचली असून आरोग्य विभागाची टीम दोषींवर काय कारवाई करतात याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे. असून या प्रकरणात जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याची टीम दोषींवर काय कारवाई करते.याकडे लक्ष लागलेले आहे. अधिकारी जिल्हा आरोग्य विभागाचे अधिकारी व पोलीस प्रशासनाचे अधिकारी या प्रकरणात गांभीर्याने कारवाई करतात की, इतर प्रकरणाप्रमाणेच सोपस्कार पूर्ण करतात याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे...



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : वैद्यकीय जैविक कचरा पर्यावरण व माणव, प्राणी जीवनासाठी घातक असल्याने त्याची विल्हेवाट लावण्याचे कडक नियम आहेत. मात्र, सर्व नियमांना ठेंगा दाखवत अज्ञात व्यक्तींनी २ फेब्रुवारीच्या मध्यरात्री डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळच वैद्यकीय जैविक कचरा जाळल्याची घटना घडली. त्यानंतर बुलढाणा आरोग्य विभागाच्या पथकाने ६ फेब्रुवारी रोजी पंचनामा करून डोणगाव येथील जवळपास १२ हॉस्पिटलची तपासणी केली.या चौकशीत एकाचा सुगावा लागला असल्याची चर्चा असून अद्याप मात्र, कारवाई करण्यात आली नसल्याने चर्चेला पेव फुटले आहेत.**

डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ अज्ञात व्यक्तीने जैविक कचरा जाळला होता. यामध्ये सलाइन, बॉटल, सिरिन्ज, इंजेक्शन, व्हाईल, सोनोग्राफी रिपोर्ट, रक्ताने माखलेले कपडे, आधार कार्ड झेरॉक्स व अन्य साहित्य होते. या कचऱ्याला आग लावल्यानंतर गुरुवारी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बलकार, मेहकर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वप्निल चव्हाण, डॉ. राठोड, डॉ. राम गायकवाड यांनी पाहणी करून पंचनामा केला. तसेच शहरातील अकरा हॉस्पिटलच्या हॉस्पिटलची तपासणी केली असून या तपासणी अहवालात अनेक तपासणीमध्ये अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. जैविक कचरा प्रकरणात जिल्हा आरोग्य आरोग्य विभागाच्या वतीने डोणगाव येथील तब्बल ११ हॉस्पिटलची चौकशी करून केली असून यामध्ये अनेक प्रकार संशयास्पद आढळून आले आहेत. तसेच एक डॉक्टर्स या प्रकरणात दोषी असल्याचे माहिती मिळाली असून मात्र संबंधित डॉक्टर सर चौकशी पथकाने अद्याप कारवाई केली नसल्याची माहिती समोर येत आहे त्यामुळे त्या दोषी डॉक्टरवर कारवाई का नाही असा प्रश्न या निमित्ताने परिसरात चर्चेला आला आहे याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन जैविक कचरा प्रकरणी संबंधित जोशी डॉक्टर्सवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# खडकपूर्णा जलाशयामध्ये पाच बोटी पकडून जिलेटिन च्या साहाय्याने उडविल्या

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :**मा जिल्हाधिकारी बुलढाणा किरण पाटील यांचे मार्गदर्शना खाली आज दी ६/३/२०२५ रोजी अवैध रेती उपसा करणाऱ्या बोटींचा शोध घेण्यासाठी महसूल विभाग, पोलीस विभाग, परिवहन विभाग, खडकपूर्ना प्रकल्प विभाग यांनी संयुक्त पणे जिल्हा स्तरीय शोध व बचाव पथकाच्या सहाय्याने शोध मोहीम हाती घेतली.

संपूर्ण दिवसभर ही कार्यवाही सुरू होती . ,काही बोटी मराठवाडा शिवारात जाफराबाद कडे पळून गेल्या. शेवटी मौजे चिंचखेड शिवारात अवैध रेती उपसा करणाऱ्या तीन फायबर बोटी व दोन इंजिन बोटी अशा एकूण पाच बोटी पकडण्यात आल्या . त्यांना किनाऱ्यावर आणून स्फोटके लावून उडविण्यात येऊन त्याची नष्ट करण्यात करण्यात आले. सदर बोटी किनाऱ्यावर लावणे व त्यानंतर जिलेटिन च्या साहाय्याने उदविण्यासाठी बराच त्रास घ्यावा लागला बराच अडचणीचा सामना करावा लागला, त्या अडचणीवर मात करत शेवटी बोटी उडविण्यात यश आले ही कार्यवाई मा उप विभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांचे मार्गदर्शन तथा उपस्थितीत पार पडली. यावेळी मा तहसीलदार वैशाली डोंगरजाळ मॅडम, नायब तहसीलदार संतोष मुंडे साहेब, ना तहसीलदार सायली जाधव मॅडम, मंडळ अधिकारी विजय हिरवे, प्रल्हाद केदार, ग्राम महसूल अधिकारी विलास नागरे, परमेश्र्वर बुरकुल, सागर देशपांडे, सुमित जाधव, संजय बरांडे, तेजस शेटे महसूल सेवक काकडे व हरने ई सर्व महसूल विभाग अधिकारी /कर्मचारी महिला पोलीस उपनिरीक्षक कोमल शिंदे मॅडम व इतर पोलीस कर्मचारी, परिवहन विभागाचे अधिकारी परिवहन निरीक्षक प्रतीक रोडे साहेब व सहकारी , खडकपुर्णा प्रकल्प उपविभाग चे अधिकारी एस जे तल्हार व सहकारी ,शोध व बचाव पथक मोहीम चे पवार साहेब व त्यांचे सहकारी हजर होते. ही कार्यवाही रात्री ११ वाजेपर्यंत सुरू होती.



# भैय्या जोशींच्या वक्तव्याचा शिवसेनेच्या उबाठा गटाकडून निदर्शने

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** मराठी भाषेच्या संदर्भात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यवाहक भैया जोशी यांनी केलेल्या वक्तव्याच्या निषेधार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाच्या वतीने बुलढाणा येथे जिल्हाप्रमुख जालिंदर बुधवत व जिल्हा समन्वयक संदीप शेळके यांच्या नेतृत्वात निदर्शने करण्यात आली. कित्येक वर्षांच्या प्रयत्नानंतर मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. यामुळे मराठी भाषा गौरव दिनाच्या धरतीवर राज्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी सरकारकडून विविध कार्यक्रम हाती घेतले जात आहेत. तर, काही दिवसांपूर्वी मुंबईत मराठी माणसाला अपमानास्पद वागणूक मिळाल्याची घटना ताज्या असताना आता राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे कार्यवाहक भैय्या जोशींनी मराठी भाषेबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे याचे पडसाद राज्यभरात उमटताना दिसून येत आहेत. आज बुलढाणा शहरामध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून जोशी यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी प्रचंड नारेबाजी करण्यात आली. यावेळी शिवसेना उबाठा बुलढाणा जिल्हा प्रमुख जालिंदर बुधवत, शिवसेना उबाठा बुलढाणा जिल्हा समन्वयक संदीप शेळके यांच्या नेतृत्वात भैय्या जोशींच्या वक्तव्याचा शिवसेनेच्या उबाठा गटाकडून निदर्शने करण्यात आली.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी शिव, शाहू, आंबेडकरांच्या विचारांची पेरणी करावी लागेल

## आमदार सिद्धार्थ खरात यांचे विधान भवनात मत

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** आज महिला कोणत्याही ठिकाणी सुरक्षित नाहीत.सर्वसामान्य महिलांपासून ते केंद्रीय मंत्र्याच्या मुलींपर्यंत महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे. पुरोगामी महाराष्ट्राला महिलांचा प्रचंड मोठा वारसा लाभलेला आहे. मात्र, सध्याच्या काळात महिला कुठेही सुरक्षित नाही महिलांना सुरक्षितेसाठी शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांची पेरणी करावी लागेल. असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधान भवनात आपल्या अभिभाषणात व्यक्त केले.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी महिला दिनाच्या पूर्व संधीला मांडलेल्या विशेष प्रस्तावातवर मत व्यक्त करताना म्हणाले की, राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ, रणरागिणी ताराबाई, पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर, सावित्रीबाई फुले, माता रमाई, सोयराबाई या महा महिलांचा वैचारिक वारसा लाभलेला आहे.तसेच आई माझी आई रेश्माबाई खरात बहिणी व सर्व महिलांच्या सहकार्याने मी इथपर्यंत आलेलो आहे त्यांचे आभार मानत आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, महाराष्ट्राला पुरोगामी महाराष्ट्राला मध्ययुगीन काळात चक्रधर स्वामी यांचा वैचारिक वारसा लाभलेला आहे. संत ज्ञानेश्र्वर संत तुकाराम या सर्वांना त्याच बरोबर राजमाता जिजाऊ, शिवाजी महाराज यांना शिकवण दिली आहे.त्यामुळेच त्यांनी स्वराज्य उभे केले आहे. राजमाता जिजाऊ या नवउर्जा निर्मितीचे स्रोत आहेत. त्याचबरोबर त्यांच्यानंतर राणी ताराबाई यांनी राज्यकारभार उत्तमरीत्या केला आहे.औरंगजेबाची कबर ताराबाई यांनी बांधली आहे. त्यानंतर मल्हारराव होळकर यांनी इंदूरवर स्वारी केली. तेव्हा इंदूरमध्ये राज्य केले. महाराष्ट्राच्या इतिहासात अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सुवर्ण अक्षराने कोरलेले आहे. काशी विश्र्वनाथ, सोमनाथ या धार्मिक स्थळाचा उद्धार त्यांनी केला आहे. संविधानाच्या १४ व १५ मध्ये सर्वांना समानतेचा अधिकार दिला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शिवाजी महाराज यांच्या विचाराचा महाराष्ट्राला लाभलेला आहे. असे असले तरी महाराष्ट्रात महिला सुरक्षित नाहीत. सर्वसमान्य सर्वसामान्य महिला पासून ते सर्व केंद्रीय मंत्र्यांची मुलगी सुद्धा सुरक्षित नाही. महिलांना सुरक्षित करण्यासाठी राज्यात शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांची पेरणी करावी लागणार आहे.असे मत यावेळी आमदार सिद्धार्थ खरात यांनी व्यक्त केले.




# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचा जनता दरबार

## नागरिकांचे प्रश्न तात्काळ निकाली लावण्याचे जाधव यांचे निर्देश





दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी :** शिवसेना जनसंपर्क कार्यालय मेहकर येथे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी लोकसभा मतदारसंघासह विविध भागातून आलेल्या नागरिकांशी ७ मार्च रोजी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी उपस्थित नागरिकांनी त्यांना भेडसावणारे विविध प्रकारचे प्रश्न मांडले, त्यांचे प्रश्न जाणून घेतले. तसेच या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. शिवसेनेचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जनता दरबार घेत नागरिकांचे प्रश्न मार्गी लावल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केल्या जात आहे.

मतदारसंघातील नागरिकांचा हाच विश्वास सार्थ ठरविण्यासाठी आणि त्यांना दैनंदिन आयुष्यात भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी तसेच शासन दरबारी रखडलेले प्रश्न जलदगतीने मार्गी लावण्यासाठी नियमित स्वरूपात '' केंद्रीय मंत्री आपल्या भेटीला – जनता दरबार उपक्रमाचे ''आयोजन करण्यात येते.याप्रसंगी त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर असून, सर्वोतोपरी प्रयत्न करत राहणार असल्याचा विश्र्वास नागरिकांशी संवाद साधत असतानी व्यक्त केला.